# Central Post

Rotary
Rotary Club of Ahmednagar Central




## UNITE FOR GOOD



Director WINS
Director Bulletin Editor
**Rtn. Sujata Katariya**



**President**
Rtn. Sunil Katariya



**Secretary**
Rtn. Amar Gurap

RID 3132
CLUB ID : 26235

Official Bulletin –
**Issue No.15**

Rotary Year 2025–26

अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांचे संयुक्त आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीअहिल्यानगर महानगरपालिका सफाई कर्मचारी प्रतिनिधी, अहिल्यानगर – नंदनवन लॉन येथे आज सकाळी ११ वाजल्यापासून सर्वांगीण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीपणे पार पडले.या प्रसंगी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त श्री. यशवंतजी डांगे साहेब, आरोग्य विभाग प्रमुख डॉ. दिलीप बागल, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. साबळे, तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष रोटे. सुनील कटारिया व सन्माननीय सचिव रोटे. अमर गुरप उपस्थित होते.या आरोग्य तपासणी शिबिरात महानगरपालिकेतील विविध तज्ज्ञ डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट सेवा दिली. शिबिरामध्येनाक–कान–घसा तपासणीत्वचारोग तपासणीरक्तदाब तपासणीमधुमेह (डायबेटिस) तपासणीनेत्र तपासणीअशा विविध वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर आवश्यक त्या उपचारांसह औषधे देण्यात आली तसेच पुढील तपासणी व उपचारांबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले.या शिबिराचा लाभ सुमारे ६५० ते ७०० नागरिकांनी घेतला. सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर अत्यंत नियोजनबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले.अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहमदनगर यांच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले.







अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
कर्मचाऱ्यांचे आरोग्य, शहराचे खरे सामर्थ्य
भारत अभियान 2.0
LiFE


महानगरपालिका,अहिल्यानगर
यांचे आरोग्य, शहराचे खरे सामर्थ्य"
भारत अभियान 2.0
LiFE
Lifestyle for Environment


Rotary
UNITE FOR GOOD
Rotary Club of Ahmedanagar Central
Rtn. Francessco Arezzo RI President
Rtn. Sudhir Lature DG RID 3132
Rtn. Amar Gurap Secretary
औषध विभाग



आज रोजी विसापूर येथील जिल्हा कारागृह अधीक्षक कार्यालयास भेट देण्यात आली. कारागृहामधील काही आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने ही प्राथमिक भेट होती.या भेटीदरम्यान रोटेरियन अजय गांधी व रोटेरियन हरीश नय्यर हे उपस्थित होते. तसेच कारागृह अधीक्षक मा. इनामदार साहेब आणि वैद्यकीय विभाग प्रमुख सौ. सोनमळी यांची उपस्थिती होती.या प्रसंगी आवश्यक सुविधांबाबतचे मागणीपत्र सादर करण्यात येणार आहे. प्राप्त मागणीपत्राच्या अनुषंगाने रोटरी क्लब समितीमध्ये सविस्तर व विचारपूर्वक चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल.




रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहमदनगरआणिसंकल्पनिति फाउंडेशन, श्रीगोंदायांच्या संयुक्त विद्यमाने शवपेटी हस्तांतरण सोहळायेत्या शनिवारी सायंकाळी ठीक ६.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.या सामाजिक उपक्रमासाठी सर्व रोटरियन्स यांनी आवर्जून उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.आपली उपस्थिती या उपक्रमाला निश्चितच प्रेरणादायी ठरेल.






# Congratulations & Best Wishes

Heartiest congratulations to Lajari Pardeshi on being selected to represent Maharashtra for the 22nd Federation Cup Korfball.

We wish her the very best for outstanding performance and great success in the tournament.May she make Maharashtra proud!

दैनिक **जनमत**

पत्रकार महेंद्र रणधीर

## २२ व्या फेडरेशन कप कॉर्फबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची घोषणा

दौंड, दि.१२ (प्रतिनिधी)– फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवारा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या २२ व्या फेडरेशन कप कॉर्फबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र कॉर्फबॉल असोसिएशनने महाराष्ट्र राज्य संघाची घोषणा केली आहे.

कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे संस्थापक सदस्य डॉ. प्रविण मानवतकर आणि महाराष्ट्र कॉर्फबॉल असोसिएशनचे मा. सचिव किशोर बागडे यांनी संघाची अधिकृत घोषणा केली. संघाच्या कर्णधारपदी बारामतीचा निखिल गोफणे याची निवड करण्यात आली असून, उपकर्णधारपदी अहिल्यानगरची साजरी परदेशी हिची निवड करण्यात आली आहे.





कॉर्फबॉल हा जगातील एकमेव खेळ असून एका संघात चार पुरुष आणि चार महिला खेळाडू एकत्र खेळतात. स्त्री–पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने या खेळाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र संघाने गेल्या काही वर्षांत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली असून अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. संघातील खेळाडूंमध्ये निखिल गोफणे, हर्ष मोहिते, वाहिद मुलाणी, नंदकुमार मालुसरे, सई साठे, पूजा पांढरे, निशा पंड्या (पुणे), संस्कृती पाटील (पिंपरी–चिंचवड), दिशान गांधी, साजरी परदेशी, भक्ती परदेशी (अहिल्यानगर), आदित्य कर्डे (सोलापूर) आणि प्रतीक कंगळकर (मुंबई) यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून श्री. केतन भापकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्पर्धेपूर्वी बारामती येथील तुळजाराम चतुर्भुज महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संघाचे प्रशिक्षण शिबिर पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप तसेच प्रशिक्षक डॉ. गौतम जाधव आणि श्री. अतुल खोमणे यांनी संघाला शुभेच्छा देत पंजाबकडे रवाना केले. महाराष्ट्र संघ या स्पर्धेत विजेतपद पटकावेल, असा विश्वास संघ व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.